दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


### आजचे पंचांग

रविवार दि. ५ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, तृतीया सकाळी १०-१० पर्यंत,
दिवस नक्षत्र-विशाखा रात्री १२-०८ पर्यंत नंतर अनुराधा, चंद्र रास- तुला संध्याकाळी ५-२८ पर्यंत नंतर वृश्चिक, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### पॅट कमिन्स संघाबाहेर

**पुणे :** आयपीएल 2026 हंगामात इंडियन प्रीमियर लिग सुरू असताना सनरायदर्स हैदराबाद संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा कर्णधार आणि वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स पाठीच्या दुखण्यामुळे संघाबाहेर झाला असून पुढील तपासणीसाठी तो ऑस्ट्रेलियाला परतला आहे. कमिन्सच्या अनुपस्थितीमुळे SRHच्या गोलंदाजी विभागावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनी माहिती दिली.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ५ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### बुवाबाजीत ३९ आमदार अडकल्याचा खळबळजनक आरोप

**मुंबई :** भोंदू अशोक खरातच्या बुवाबाजीत राज्यातील ३९ आमदार अडकल्याचा गंभीर आरोप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीने केला. या सर्व आमदारांची यादी राज्य सरकारने तातडीने जाहीर करावी आणि त्यांचे राजीनामे घ्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. या आमदारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सोमवारी राज्यभरात आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. भोंदू बाबा अशोक खरात याच्या शोषणाला बळी पडलेल्या अनेक महिलांच्या अश्लील चित्रफिती मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांवर फिरत आहेत. त्यामुळे बळी पडलेल्या महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचली आहे. या चित्रफिती समाज माध्यमांतून तातडीने हटविण्याची कारवाई राज्य सरकारने करावी, असेही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने म्हटले आहे.

### जयंत पाटील-शरद पवार भेटीने रणनीती चर्चेला उधाण

**मुंबई :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर Jayant Patil यांनी Sharad Pawar यांची मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. ही भेट आगामी निवडणूक रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. Baramati पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवार यांची अधिकृत उमेदवारी निश्चित मानली जात असून निवडणूक बिनविरोध होईल अशी चर्चा होती. मात्र काँग्रेसने स्वतंत्र उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय समीकरणांमध्ये बदल झाला आहे. काही अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र ज्ञान सभा-2026' राष्ट्रीय परिषदेचे नागपुरात भव्य उद्घाटन

# शैक्षणिक पद्धतीला नवी दिशा आवश्यक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नागपूर :** महाराष्ट्र ज्ञान सभा-2026 या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज नागपुरातील व्हीएनआयटी येथे उत्साहात पार पडले. या उद्घाटन सत्रात देवेंद्र फडणवीस यांनी नव्या शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीकोनावर भाष्य करताना "वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण आणि भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण" हेच शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले. या परिषदेला देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "केवळ ऐतिहासिक गौरवावर समाधान मानून चालणार नाही, तर वर्तमान आणि भविष्यातील जागतिक आव्हाने लक्षात घेऊन शिक्षण प्रणालीत बदल करणे अत्यावश्यक आहे." त्यांनी शिक्षणात सर्वंकष विकास, नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक कौशल्य यांचा समन्वय साधण्याची गरज अधोरेखित केली.

जगात बदलांचा वेग प्रचंड वाढला असून, मागील १५ वर्षांत तीन औद्योगिक क्रांती घडल्याचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, Artificial Intelligence आणि डीप टेक्नॉलॉजीमुळे प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होत आहे. "येत्या हजार दिवसांत सुमारे ६० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहे. मात्र, याचा अर्थ बेरोजगारी वाढेल असा नाही, तर नवीन संधी निर्माण होतील," असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, संगणक क्रांतीच्या काळातही अशाच भीती व्यक्त करण्यात आल्या होत्या, पण भारताने त्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यामुळे तंत्रज्ञानासोबत चालत राहणे आणि शिक्षण पद्धती त्यानुसार विकसित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. विदेशी विद्यापीठांच्या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, "एक काळ असा होता की आपण विदेशी विद्यापीठांशी स्पर्धा करू शकत नव्हतो. मात्र, आज परिस्थिती बदलली आहे." नवी मुंबईत उभारण्यात येत असलेल्या 'एज्युसिटी'मुळे विद्यार्थ्यांना कमी खर्चात जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी विद्यापीठांना आवाहन केले की, "जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी अभ्यासक्रम, संशोधन आणि अध्यापन पद्धती अधिक सक्षम व आधुनिक करणे आवश्यक आहे." शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यावरही त्यांनी भर दिला.

#### ज्ञानाचा प्रवाह सतत पुढे नेण्याचे आवाहन

● "समाजात काहीही स्थायी राहणार नाही, त्यामुळे प्रत्येकाने नव्या पद्धती स्वीकारण्याची तयारी ठेवली पाहिजे," असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिक्षक आणि शिक्षणसंस्थांना काळानुरूप विषयांची निवड करण्याचे आवाहन केले. ज्ञानाचा प्रवाह सातत्याने पुढे नेणे हीच खरी प्रगती असल्याचे त्यांनी नमूद केले.

## विधान परिषदेच्या निवडणुकीत ठाकरे गटाला पवारांचा पाठिंबा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधान परिषदेच्या निवडणुकीची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महत्त्वाचे संकेत देत महाविकास आघाडीतील राजकीय समीकरणांना नवे वळण दिले आहे.

सिल्व्हर ओक या निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना पवार यांनी सांगितले की, राज्यसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील ठाकरे गटाने त्यांना पाठिंबा दिला होता. "त्या पाठिंब्याची परतफेड म्हणून विधान परिषदेच्या निवडणुकीत ठाकरे गटाचा उमेदवार असेल, तर त्याला आमचा पूर्ण आणि बिनशर्त पाठिंबा असेल," असे स्पष्ट संकेत त्यांनी दिले. राज्यातील विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी लवकरच निवडणूक होणार आहे. सध्याच्या विधानसभेतील संख्याबळ पाहता, महायुतीच्या वाट्याला आठ जागा जाण्याची शक्यता आहे, तर महाविकास आघाडीला केवळ एकाच जागेवर समाधान मानावे लागणार आहे. या एकमेव जागेसाठी आघाडीत आतापर्यंत रस्सीखेच सुरू होती. मात्र पवार यांच्या वक्तव्यामुळे ही जागा आता ठाकरे गटाच्या वाट्याला जाण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. या घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत तणाव काही प्रमाणात कमी होण्याची चिन्हे दिसत आहेत. तसेच, ठाकरे गटाची राजकीय ताकद टिकवून ठेवण्यासाठी ही संधी महत्त्वाची ठरू शकते. दरम्यान, पुढील महिन्यात उद्धव ठाकरे यांचे विधान परिषद सदस्यत्व संपणार आहे. त्यामुळे ते स्वतः निवडणुकीच्या रिंगणात उतरणार की एखाद्या निष्ठावान सहकाऱ्याला संधी देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गरिबांचे रक्त पिणाऱ्या बिल्डरांना सोडणार नाही - बावनकुळें

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** नाशिकमधील म्हाडा गृहप्रकल्पात गरिबांच्या हक्काची घरे हडपण्याचे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यात कितीही मोठा 'मासा' असला तरी त्याला सोडले जाणार नाही. गरिबांचे हक्क हिरावून घेणाऱ्या आणि त्यांचे रक्त पिणाऱ्या बिल्डरांना आम्ही सोडणार नाही, प्रसंगी या प्रकरणाचा तपास 'ईडी'कडे सोपवू," असा सज्जड दम राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिला. नाशिक दौऱ्यावर असताना माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी म्हाडा घोटाळ्यावरून भूमाफियांना कडक इशारा दिला.

बावनकुळे म्हणाले की, "गरिबांसाठी असलेली २० टक्के घरे बळकावली गेली आहेत. एकाच दिवसात जमिनीचे तुकडे पाडणे, नोंदी घेणे आणि नकाशे मंजूर करणे ही मोठी रिंग आहे. या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून यात एक आयपीएस आणि दोन आयएएस अधिकारी आहेत. १५ दिवसांत अहवाल येईल. लाचलुचपत विभाग आणि भूमी अभिलेख विभागातून या घोटाळ्याची सुरुवात झाली असून, नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना याप्रकरणी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ शिक्षा नाही, तर बिल्डरांकडून २० टक्के मालमत्ता रिकव्हर करून ती गरीबांना मिळवून देणार असेही ते म्हणाले. मागील दोन दिवसांत समाजमाध्यमांवर असलेल्या काही व्हीडिओबाबत बावनकुळे म्हणाले की, मी एवढंच म्हटलं होतं की ज्यांच्या फार्महाऊस आहेत.

### महापालिकेच्या निष्काळजीपणावर संताप; माजी आमदारांचा आंदोलनाचा इशारा

# जयपूरमध्ये दूषित पाण्यामुळे आरोग्यसंकट!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जयपूर :** शहरातील सुशीलपुरा (वॉर्ड ४५) परिसरात दूषित पाण्यामुळे भीषण आरोग्यसंकट निर्माण झाले आहे. गेल्या आठवडाभरापासून नळातून सांडपाणी मिसळलेले घाण पाणी येत असल्याने १००० हून अधिक नागरिक आजारी पडले आहेत. उलट्या, जुलाब आणि तापाच्या तक्रारींनी घराघरांत लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक त्रस्त झाले असून, प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सुशीलपुरा परिसरात सध्या दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. रस्ते खोदून ठेवले असून त्यात साचलेले गटाराचे काळे पाणी नागरिकांसाठी मोठा त्रास ठरत आहे. या घाणीमुळे परिसरात राहणेही अवघड झाले असून, एकीकडे आजारपण आणि दुसरीकडे अस्वच्छता अशा दुहेरी संकटात नागरिक सापडले आहेत. दवाखान्यांचे वाढते बिल आणि रोजचा खर्च यामुळे सामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी होत आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, महिनाभरापूर्वी महापालिकेकडून चांगला सिमेंट रस्ता विनाकारण खोदण्यात आला. यावेळी कामगारांकडून सांडपाण्याची लाईन तुटली. त्यानंतर पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईनमध्ये गटाराचे पाणी मिसळले गेले. परिणामी, नागरिकांच्या नळातून थेट दूषित पाणी येऊ लागले. अवघ्या तीन वर्षांपूर्वी बसवलेली पाणीपुरवठा यंत्रणा अशा प्रकारे निकामी झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

**नागरिकांच्या खिशाला फटका**

या परिस्थितीमुळे नागरिकांना पिण्यासाठी बाहेरून पाणी विकत घ्यावे लागत आहे. दररोज २०० ते ३०० रुपये फक्त पाण्यासाठी खर्च होत असल्याने कुटुंबांचे बजेट कोलमडले आहे. पूरनमल कुमावत यांच्या कुटुंबातील सर्वजण आजारी असून त्यांच्या पत्नीला इंजेक्शन घ्यावे लागले. जानकी सैनी यांच्या मुलांना पोटदुखीचा त्रास होत आहे. जगदीश साहूंसारख्या अनेक कष्टकरी कुटुंबांसमोर "घर चालवायचे कसे?" हा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणावरून माजी आमदार प्रतापसिंह खाचरियावास यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. "चांगला रस्ता कशासाठी उकरला? त्यामुळंच लाईन फुटल्या आणि लोक आजारी पडले," असा आरोप त्यांनी केला. तसेच, परिस्थिती लवकर सुधारली नाही तर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.एकूणच, सुशीलपुरातील ही परिस्थिती प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा गंभीर नमुना ठरत असून, तातडीने उपाययोजना न केल्यास आरोग्यसंकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### "कुटुंब म्हणून एकत्र राहावं"; बारामती पोटनिवडणुकीवरही भूमिका स्पष्ट

## राष्ट्रवादी विलीनीकरणावर जय पवार यांचे सूचक विधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यात पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना वेग आला असताना जय पवार यांनी यावर पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. बारामती दौऱ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना त्यांनी "कुटुंब म्हणून सर्वांनी एकत्र राहावं" अशी भूमिका मांडत सूचक संकेत दिले.

अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती नुकसानीची पाहणी करण्यासाठी बारामतीत आलेल्या जय पवार यांना पत्रकारांनी विलीनीकरणाबाबत प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, "या विषयावर माझी वैयक्तिक भूमिका नाही. मी अजून लहान आहे. याबाबत Sunetra Pawar, Parth Pawar तसेच पक्षातील वरिष्ठ नेते निर्णय घेतील. मात्र कुटुंब म्हणून आपण सर्व एकत्र राहणं गरजेचं आहे."

ते पुढे म्हणाले की, Ajit Pawar यांच्या जाण्यानंतर पवार कुटुंब एकत्र राहिले असून आजही संवाद सुरू आहे. राजकारणावर जास्त भाष्य करणं योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीबाबत बोलताना जय पवार म्हणाले की, ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी स्थानिक जनतेची भावना आहे. Sharad Pawar यांच्याकडूनही त्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

"ही निवडणूक होणंच दुःखद आहे. मात्र विरोधकांना निवडणूक लढवायची असेल तर त्यांनी जरूर लढवावी," असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी Ajit Pawar यांच्या लोकशाही मूल्यांचा उल्लेख करत सांगितले की, "अजितदादांनी कधीही कुणाला निवडणूक लढण्यापासून रोखले नाही. आम्हीही त्याच विचारांवर पुढे जात आहोत."

### सातारा जिल्हा परिषदेत 'हाय व्होल्टेज ड्रामा'

**मुंबई:** जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुकीनंतर शनिवारी विषय समित्यांच्या निवडणुकीतही मोठा राजकीय तणाव पाहायला मिळाला. भाजपकडून झालेल्या फोडाफोडीचा आणि पोलिसांच्या कथित दंडकाईचा निषेध करत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला. त्यामुळे सर्व निवडी बिनविरोध पार पडल्या. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने आपल्या सदस्यांना तीन दिवस कास पठार परिसरातील रिसॉर्टमध्ये ठेवले होते. त्यानंतर फर्न हॉटेलमध्ये बैठक घेऊन सदस्यांना लक्झरी बसने जिल्हा परिषदेत आणण्यात आले.

## नालेसफाईच्या कामांबाबत गैरप्रकार झाल्यास थेट कारवाई

### महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर यांनी अभियंत्यांनी नालेसफाईच्या प्रत्येक टप्प्यावर वैयक्तिक लक्ष ठेवणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. तसेच कामाच्या ठिकाणी अभियंत्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली असून, कोणताही गैरप्रकार आढळल्यास कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

महानगरपालिकेकडून १२ मार्च २०२६ पासून गाळ काढण्याची कामे सुरू करण्यात आली आहेत. मिठी नदी परिसरासह पूर्व उपनगरांमध्ये तीन पॅकेजअंतर्गत विविध ठिकाणी कामे सुरू आहेत.

बांगर यांनी कनेक्टर ब्रिज, वांद्रे-कुर्ला संकुल परिसर, अंबानी शाळालगत तसेच मुलुंड आणि घाटकोपर येथील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. नालेसफाईच्या कामांमध्ये वेग वाढवण्यावर भर देताना, पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले. प्रत्येक नाल्याचे काम कधी सुरू होणार आणि कधी पूर्ण होणार याचे काटेकोर नियोजन करून ती माहिती महानगरपालिकेच्या डॅशबोर्डवर उपलब्ध करण्यास सांगितले आहे.

### सुषमा अंधारे यांचे गंभीर आरोप; 'तपास मॅनेज केला जातोय का?'

# अशोक खरात प्रकरणावरून राजकीय वाद तापला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणावरून राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, सुषमा अंधारे यांनी राज्य सरकार आणि तपास यंत्रणांवर गंभीर आरोप केले आहेत. "गृहमंत्र्यांना हे प्रकरण मॅनेज करायचं आहे का?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित करत तपासाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

अंधारे यांनी आरोप केला की, या प्रकरणात काही निवडक नेत्यांचीच नावे पुढे आणली जात आहेत. चंद्रकांत पाटील आणि आशिष शेलार यांची नावे 'अँटी-सीएम' यादीतून समोर येत असल्याचे त्यांनी म्हटले. "ज्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी थेट संबंध नाही, त्यांच्याच कॉल डिटेल रेकॉर्ड्स (सीडीआर) बाहेर येत आहेत. मात्र जयकुमार रावल किंवा गिरीश महाजन यांची माहिती का समोर येत नाही?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सीडीआर लीक होण्याच्या मुद्द्यावरही अंधारे यांनी तीव्र शंका व्यक्त केली. "हे सीडीआर बाहेर कसे आले? ज्याला दमानिया ओळखत नाही, तो व्यक्ती दमानियाला कसा ओळखतो?" असा प्रश्न उपस्थित करत संबंधित व्यक्तीची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. तपास यंत्रणांकडून निवडक माहितीच बाहेर आणली जात आहे का, असा संशयही त्यांनी व्यक्त केला.

याच पार्श्वभूमीवर अंधारेंनी विशेष तपास पथक (SIT) वरही प्रश्न उपस्थित केले. "आतापर्यंत एसआयटीवर विश्वास होता, मात्र आता संशय निर्माण झाला आहे," असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. तपासाच्या प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, नीलम गोऱ्हे यांच्यावरही अंधारेंनी टीका केली. "मी पुराव्याशिवाय बोलत नाही, पण त्यांना विज्ञानवादी समजण्याचे कारण नाही," असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्ष टोला लगावला.

या सर्व घडामोडींनंतर अंधारेंनी या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी CBIकडे चौकशी सोपवण्याची मागणी केली आहे. "या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे," असे त्यांनी सांगितले. एकूणच, या आरोप-प्रत्यारोपांमुळे अशोक खरात प्रकरण पुन्हा एकदा राजकीय वादाच्या केंद्रस्थानी आले आहे. या प्रकरणात पुढे काय घडते, तपासाची दिशा कशी बदलते आणि सरकारची भूमिका काय राहते याकडे राज्यभरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## मध्य प्रदेशात भीषण दुर्घटना : तीन मजली इमारत कोसळली, एकाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अनुपपूर जिल्ह्यातील कोटमा शहरात शनिवारी संध्याकाळी एक भीषण दुर्घटना घडली. बसस्थानकाजवळील अग्रवाल लॉजची तीन मजली इमारत अचानक कोसळल्याने एकाचा मृत्यू झाला असून, पाच ते सहा जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वॉर्ड क्रमांक ५ मधील या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी इमारतीत अनेक नागरिक उपस्थित होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस, महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाची पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य सुरू केले आहे.

बचाव पथकांनी तातडीने कारवाई करत ढिगाऱ्याखालून दोन जणांना सुरक्षित बाहेर काढले असून, त्यांना कोटमा येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मात्र, अजूनही चार ते पाच जण अडकल्याची शक्यता वर्तवली जात असून, जेसीबी आणि इतर यंत्रणांच्या साहाय्याने ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, कोसळलेल्या इमारतीलगत नव्या बांधकामाचे काम सुरू होते. या दरम्यान झालेल्या भूमिगत खोदकामामुळे जुन्या इमारतीचा पाया कमकुवत झाल्याने हा अपघात घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनास्थळी मोठी गर्दी जमल्याने प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन केले आहे. अपघाताचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार असून, सध्या सर्वांचे लक्ष बचावकार्यावर केंद्रित आहे.

# संपादकीय

## इतिहास, सत्ताकथा आणि मानवी वेदनांचा वैश्विक पट

**‘आंतरराष्ट्रीय बुकर पारितोषिक २०२६’ची अंतिम यादी जाहीर होताच जागतिक साहित्यविश्वात पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे. या वर्षीच्या यादीतील सर्व पुस्तकांना एक समान धागा जोडतो—तो म्हणजे गेल्या शतकभरातील राजकीय, सामाजिक आणि मानवी घडामोडींवर टाकलेला प्रकाश. विविध देश, भाषा आणि संस्कृती यांतील कथा या यादीतून समोर येतात; मात्र त्या सर्व कथा एकाच वास्तवाकडे निर्देश करतात—सत्तेचा प्रभाव, संघर्ष आणि त्यातून उभ्या राहणाऱ्या मानवी वेदना.**

या यादीत १९३० च्या दशकातील तैवानपासून ते क्रांतीनंतरच्या इराणपर्यंत, अल्बेनियन आल्प्सपासून ते पॅरिसच्या उपनगरांपर्यंतचे विविध संदर्भ आढळतात. प्रत्येक कादंबरी ही एका विशिष्ट काळातील आणि स्थानातील सत्ताकेंद्रित वास्तव उलगडते. सत्तेच्या निर्णयांचा सामान्य लोकांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो, हे या पुस्तकांमधून प्रभावीपणे मांडले गेले आहे. या वर्षीच्या अंतिम यादीत विशेष लक्ष वेधून घेणारे नाव म्हणजे भारतीय वंशाच्या कॅनेडियन-अमेरिकी लेखिका आणि प्राध्यापिका पद्मा विश्वनाथन. त्यांनी पोर्तुगीज भाषेतील ‘ऑन अर्थ अॅज इट इज बिनीथ’ या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद केला आहे. मूळ ब्राझिलियन लेखिका अॅना पॉला माइया यांच्या या डिस्टोपियन कादंबरीत गुलामांच्या छळछावण्यांतील अमानुष अत्याचारांचे चित्रण आहे. ही कथा केवळ एका विशिष्ट काळाची नाही, तर सत्तेच्या अंधकारमय चेहऱ्याचे प्रतीक आहे. विश्वनाथन यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अनुवादासाठी त्यांना तब्बल नऊ आठवडे आणि पाच खड्यांचा प्रवास करावा लागला—यातून या कादंबरीच्या गुंतागुंतीची कल्पना येते. यादीतील आणखी एक महत्त्वाची कादंबरी म्हणजे ‘द नाइट्स आर क्वाएट इन तेहरान’. शिदा बझियार यांच्या जर्मन भाषेतील या कादंबरीचा अनुवाद रुथ मार्टीन यांनी केला आहे. ही कथा एका इराणी कुटुंबाच्या प्रवासाची आहे—क्रांतीपासून ते जर्मनीतील निर्वासित जीवनापर्यंत. राजकीय उलथापालथ, स्थलांतर आणि ओळख गमावण्याची वेदना यांचे अत्यंत संवेदनशील चित्रण या कादंबरीत आढळते.

‘शी हू रिमेन्स’ ही रेने काराबाश यांची कादंबरी देखील या यादीत समाविष्ट आहे. बल्गेरियन भाषेतील या कादंबरीचा अनुवाद इझिडोरा अँजेल यांनी केला आहे. अल्बेनियन आल्प्सच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही कथा एका किशोरवयीन मुलीची आहे, जी जबरदस्तीच्या विवाहातून सुटका मिळवण्यासाठी स्वतःचे स्त्रीत्व त्यागते आणि ‘स्वोर्न व्हर्जिन’ बनते. ही कथा स्त्रीस्वातंत्र्य, सामाजिक बंधने आणि ओळखीच्या शोधाची आहे. ‘द डायरेक्टर’ ही डॅनियल केल्मन लिखित कादंबरी नाझी जर्मनीच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. रॉस बेंजामिन यांनी याचा अनुवाद केला आहे. या कादंबरीत हिटलरच्या काळातील अत्याचारांचा उपरोधिक शैलीत वेध घेतला आहे. हॉलीवूड सोडून जर्मनीत परतलेल्या चित्रपट निर्मात्याच्या आयुष्यावर आधारित ही कथा सत्तेच्या छायेत कलाकारांचे जीवन कसे बदलते, हे दाखवते. मेरी एनडाय यांच्या ‘द विच’ या कादंबरीचा अनुवाद जॉर्डन स्टम्प यांनी केला आहे. तीस वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या या कादंबरीत फ्रान्समधील उपनगरातील एका चेटकीणीची आणि तिच्या जुळ्या मुलींची कथा आहे. ही कथा केवळ गूढतेची नाही, तर समाजातील भीती, पूर्वग्रह आणि स्त्रीशक्तीच्या दडपशाहीचीही आहे. यांग शुआंग-झी यांच्या ‘तैवान ट्रॅव्हलॉग’ या कादंबरीत १९३० च्या दशकातील तैवानचा प्रवास मांडण्यात आला आहे. लिन किंग यांनी याचा अनुवाद केला आहे. एका जपानी लेखकाच्या नजरेतून तैवानची खाद्यसंस्कृती, वसाहतवाद आणि सांस्कृतिक गुंतागुंत यांचे चित्रण या कादंबरीत आढळते. समलैंगिक प्रेम आणि वसाहतवादी स्मृती यांचा संगम या कथेला अधिक सखोल बनवतो. या सर्व कादंबऱ्यांमधील एक समान वैशिष्ट्य म्हणजे त्या केवळ कथा सांगत नाहीत, तर इतिहासाचे साक्षीदार बनतात. सत्तेच्या निर्णयांनी समाजावर कसा परिणाम होतो, हे या साहित्यकृतींमधून स्पष्ट होते. या कथा वाचकाला केवळ मनोरंजन देत नाहीत, तर विचार करायला भाग पाडतात. आंतरराष्ट्रीय बुकर पारितोषिकाची खासियत म्हणजे अनुवादित साहित्याला मिळणारा सन्मान. यामुळे विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्य जागतिक वाचकांपर्यंत पोहोचते. अनुवादक आणि लेखक यांचे समान योगदान या पुरस्कारात मान्य केले जाते. त्यामुळे ही स्पर्धा केवळ लेखकांची नसून, अनुवादकांचीही आहे. या वर्षीच्या यादीतून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो—जागतिक साहित्य अधिकाधिक बहुआयामी होत आहे. विविध संस्कृती, भाषा आणि अनुभव यांचा संगम या कादंबऱ्यांमध्ये दिसतो. त्यामुळे वाचकाला एका वेगळ्या जगाची ओळख होते. १९ मे रोजी होणाऱ्या सोहळ्यात विजेत्या कादंबरीची घोषणा होणार आहे. मात्र, विजेता कोणताही असो, या सर्व कादंबऱ्यांनी आधीच आपली छाप पाडली आहे. त्यांनी वाचकांना केवळ कथा दिल्या नाहीत, तर एक विचारप्रवृत्त करणारा अनुभव दिला आहे.

एकंदरीत, ‘आंतरराष्ट्रीय बुकर पारितोषिक २०२६’ची अंतिम यादी ही केवळ साहित्यिक स्पर्धा नाही, तर ती एक जागतिक संवाद आहे—इतिहास, सत्ता आणि मानवी अनुभव यांच्यातील. या यादीतून मिळणारा सर्वात मोठा धडा म्हणजे, काळ बदलतो, सत्तेची रूपे बदलतात, पण मानवी संघर्ष आणि आशा कायम राहतात. साहित्य हेच त्या संघर्षाचे आणि आशेचे सर्वात प्रभावी माध्यम ठरते.

# ट्रम्पची दिशाहीन रणनिती; विरोधाभासी विधानांत अडकले नेतृत्व



**» जगातील महासत्ता मानल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्वाकडून अपेक्षित असते ती स्थिरता, स्पष्टता आणि दूरदृष्टी. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलीकडील विधानांकडे पाहिले तर ही तिन्ही वैशिष्ट्ये पूर्णपणे हरवलेली दिसतात.**

“मी युद्ध जिंकले आहे” असे सांगतानाच “युद्ध संपवण्यासाठी अजून काही आठवडे लागतील” असे म्हणणे, “इराणची ताकद संपली आहे” असे घोषित करतानाच “इराण अजूनही भेदक मारा करू शकतो” अशी कबुली देणे—ही विरोधाभासी भूमिका केवळ गोंधळ निर्माण करणारी नाही, तर ती एका महासत्तेच्या नेतृत्वातील अस्थिरतेचे स्पष्ट दर्शन घडवते.

गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या या संघर्षात ट्रम्प यांनी सुरुवातीला अतिआत्मविश्वासाने युद्ध लवकर संपेल, असा दावा केला होता. परंतु, कालांतराने तो दावा फोल ठरला. त्यानंतरही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याऐवजी अधिक गोंधळ निर्माण करणारी वक्तव्ये केली. युद्धाचे उद्दिष्ट काय, याचेही ठोस उत्तर त्यांच्या भाषणांतून मिळत नाही. एकीकडे ते ‘राजवट बदल’ हा उद्देश नसल्याचे सांगतात, तर दुसरीकडे ‘अपेक्षित बदल झाला’ असेही घोषित करतात. अशा परिस्थितीत प्रश्न उपस्थित होतो—जर उद्दिष्ट साध्य झाले असेल, तर युद्ध सुरू ठेवण्याचे कारण काय?

ट्रम्प यांच्या या वक्तव्यांमुळे केवळ राजकीय गोंधळच निर्माण झाला नाही, तर त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवरही झाला. त्यांच्या भाषणानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर वाढले आणि शेअर बाजारात घसरण सुरूच राहिली. यावरून स्पष्ट होते की, महासत्तेच्या नेत्याच्या प्रत्येक शब्दाचा जागतिक परिणाम होतो. त्यामुळे अशा पदावर असलेल्या व्यक्तीकडून अपेक्षित असते ती जबाबदारी आणि मोजून-मापून बोलण्याची सवय—जी येथे दिसून येत नाही.

या संपूर्ण परिस्थितीकडे पाहताना एक मूलभूत प्रश्न समोर येतो—नेतृत्व म्हणजे नेमके काय? केवळ आक्रमक भूमिका घेणे, धमक्या देणे किंवा स्वतःला सर्वज्ञ समजणे हे नेतृत्वाचे लक्षण नाही. खरे नेतृत्व तेच, जे परिस्थितीची वस्तुस्थिती स्वीकारते, चुका मान्य करते आणि योग्य मार्ग निवडते. मात्र, ट्रम्प यांच्या बाबतीत उलट चित्र दिसते. त्यांनी स्वतःचा मार्ग चुकल्याचे मान्य करण्याऐवजी त्याच चुकीच्या मार्गावर ठाम राहण्याचा हट्ट धरला आहे.

मानवी जीवनातही अशी वेळ येते, जेव्हा आपण चुकीच्या दिशेने जातो. त्या वेळी थांबून विचार करणे, चूक मान्य करणे आणि योग्य मार्ग शोधणे हे शहाणपणाचे लक्षण असते. परंतु, जर आपण अहंकारामुळे चूक मान्य केली नाही, तर आपण चकव्यात अडकतो आणि त्याच जागी फिरत राहतो. ट्रम्प यांची सध्याची स्थिती याच उदाहरणासारखी आहे.

या संघर्षात आणखी एक गंभीर बाब म्हणजे नागरी सुविधांवर हल्ला करण्याची भाषा. वीजनिर्मिती प्रकल्प, जलशुद्धीकरण यंत्रणा यांसारख्या नागरिकांच्या जीवनाशी संबंधित गोष्टींवर हल्ला करणे हे केवळ लष्करी कृती नसून मानवतेवरचा आघात मानला जातो. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार अशा कृतींना युद्धगुन्ह्यांच्या श्रेणीत गणले जाते. अशा वक्तव्यांमुळे अमेरिकेच्या प्रतिमेलाही धक्का बसण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरही ट्रम्प यांची भूमिका अधिकाधिक एकाकी होताना दिसते. एकेकाळचे मित्रदेशही आता त्यांच्यापासून दूर जात आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनीसारख्या देशांनी त्यांच्या धोरणांवर नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे अमेरिकेच्या पारंपरिक मैत्री संबंधांनाही तडा जात आहे. परिणामी, चीन आणि रशियासारख्या देशांना अधिक बळ मिळण्याची शक्यता आहे.

या सर्व घटनांमधून एक महत्त्वाचा धडा समोर येतो—भावनेच्या भरात घेतलेले निर्णय दीर्घकालीन परिणाम घडवतात. नागरिकांनी केवळ भावनिक मुद्द्यांवर किंवा व्यक्तीच्या आक्रमक शैलीवर भुलून निर्णय घेतले, तर त्याचे परिणाम देशालाच भोगावे लागतात. सत्ताबदल हा केवळ असंतोषामुळे न होता, विचारपूर्वक आणि विवेकाने व्हायला हवा.

ट्रम्प यांच्या नेतृत्वामुळे आज अमेरिकेसमोर जी परिस्थिती निर्माण झाली आहे, ती केवळ एका व्यक्तीची चूक नसून समाजाच्या निर्णय प्रक्रियेचेही प्रतिबिंब आहे. लोकशाहीत नागरिकांचा निर्णय हा सर्वात मोठा असतो. त्यामुळे तो घेताना जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे. शेवटी, इतिहास नेहमी एकच गोष्ट सांगतो—आवाज मोठा असला, आक्रमकता जास्त असली तरी विजय नेहमी विवेकाचा होतो. आडमुठेपणा आणि अहंकार काही काळ प्रभावी वाटू शकतात, पण दीर्घकाळ टिकणारे असते ते शहाणपण. अमेरिकेसमोर आणि जगासमोर आज हाच प्रश्न उभा आहे—शक्तीचा मार्ग निवडायचा की विवेकाचा? जग या प्रश्नाचे उत्तर शोधत असताना, ट्रम्प यांची भूमिका मात्र अजूनही गोंधळात टाकणारीच आहे. आणि म्हणूनच, हा प्रसंग केवळ एका देशापुरता मर्यादित नसून, संपूर्ण जगासाठी एक मोठा धडा ठरतो.

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी ठोस पावले उचलणार – अध्यक्ष योगेश सोमण

## ‘कलारंग’तर्फे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भव्य गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** कला, साहित्य आणि संस्कृतीच्या जतनासाठी कार्यरत ‘कलारंग’ सांस्कृतिक कला संस्थेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा ‘सारस्वतांचा गौरव सोहळा’ निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्यासह कार्यकारिणीतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाने साहित्यप्रेमींसाठी एक वेगळीच सांस्कृतिक मेजवानी साकारली. या प्रसंगी आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक क्षमतेवर विश्वास व्यक्त करत आगामी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन शहरात आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली. “साहित्यिक समाजाला दिशा देतात. त्यांच्या कार्याचा गौरव करणे हे आपले कर्तव्य आहे. या उपक्रमामुळे शहरातील साहित्य चळवळीला नवी ऊर्जा मिळेल,” असे ते म्हणाले. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना योगेश सोमण यांनी परिषदेच्या ११९ वर्षांच्या परंपरेचा गौरव करत आगामी वाटचालीचा आराखडा स्पष्ट केला. “ही केवळ पदाची नव्हे, तर हजारो सदस्यांच्या अपेक्षांची जबाबदारी आहे. मराठी भाषेचे संवर्धन आणि तरुणांना साहित्याशी जोडणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असेल,” असे त्यांनी सांगितले.



# निगडीत ‘ऑक्सिजन पार्क’चे उद्घाटन; लोकसहभागातून हरित शहराचा आदर्श

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निगडी प्राधिकरण परिसरात उभारण्यात आलेल्या ‘ऑक्सिजन पार्क’चे उद्घाटन उत्साहात पार पडले. स्थानिक नागरिक आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेला हा प्रकल्प शहरातील पर्यावरणपूरक उपक्रमांचा आदर्श ठरत आहे. या वेळी बोलताना महापौर रवि लांडगे यांनी “लोकसहभाग हीच शहर विकासाची खरी ताकद आहे,” असे प्रतिपादन केले.

सेक्टर २६ येथे विकसित करण्यात आलेल्या या ऑक्सिजन पार्कच्या उद्घाटनावेळी हजारो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, तसेच नगरसेवक व विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. “अशा हरित प्रकल्पांमुळे पिंपरी-चिंचवड शहर अधिक आरोग्यदायी व सुंदर बनेल. शहरातील २०३ उद्यानांपैकी २५ ते ३० उद्यानांमध्ये लोकसहभागातून अशा प्रकारचे प्रकल्प राबविण्याचा आमचा मानस आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उपस्थित नागरिकांनी ‘माझी वसुंधरा’ शपथ घेत पर्यावरण संरक्षणाचा निर्धार व्यक्त केला. या शपथेच्या माध्यमातून झाडे लावणे, प्रदूषण टाळणे आणि वसुंधरेचे रक्षण करण्याची बांधिलकी व्यक्त करण्यात आली.

# पिंपळे सौदागरला मिळणार स्वतंत्र पोलीस ठाणे; सुरक्षेला नवे बळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** वेगाने विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर परिसरासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या मंजुरी प्रक्रियेला वेग आला असून, पोलीस आयुक्तालयाने याबाबतचा अधिकृत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला आहे. आमदार शंकर जगताप आणि भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे.

आयटी हब म्हणून ओळख निर्माण झालेल्या पिंपळे सौदागरमध्ये मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्वतंत्र पोलीस ठाण्याची गरज प्रकर्षाने जाणवत होती. सध्या नागरिकांना जवळच्या पोलीस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने तक्रारींवर त्वरित प्रतिसाद मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळत असून, नव्या पोलीस ठाण्यासोबतच ‘परिमंडळ ४’ स्थापन करण्याचाही प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. स्वतंत्र पोलीस ठाण्यामुळे परिसरातील गस्त वाढणार असून, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे सुलभ होणार आहे. तसेच नागरिकांना तक्रारींसाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. “पिंपळे सौदागरचा झपाट्याने विकास होत असताना नागरिकांची सुरक्षा आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणासाठी महापालिका देणार अधिकारी कर्मचाऱ्यांना अग्रिम रक्कम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणासाठी आर्थिक स्वरुपात आगाऊ रक्कम म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी कर्मचाऱ्यांना दरमहा हप्त्याने परतफेडीच्या अटीवर एकरक्कमी १५ हजार रुपये सण अग्रिम दिला जाणार आहे. याबाबतचा आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या सणाच्या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक स्वरूपात आगाऊ रक्कम देण्याचा धोरणात्मक निर्णय स्थायी समिती आणि महापालिका सभेने यापूर्वीच मंजूर केला आहे. त्यानुसार प्रत्येकी १५ हजार रुपये अग्रिम अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाटप केला जाणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हा सणासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांना एकरक्कमी आगाऊ रक्कम दिली जात असल्याचा हा निर्णय महत्त्वाचा समजला जातो.

सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन ४८०० रुपयांपेक्षा कमी किंवा सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल एस-१७ (वेतन संरचना ४७,६०० - १,५१,१००) पेक्षा कमी असणाऱ्या पात्र सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना ऐच्छिक स्वरुपात या सण अग्रिमचा लाभ मिळणार आहे. सण अग्रिम म्हणून दिली जाणारी १५ हजार रुपयांची रक्कम सदर लाभ घेतलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून मे २०२६ पासून दरमहा १५०० रुपयांप्रमाणे १० हप्त्यांमध्ये परतफेड केली जाणार आहे. ही सण अग्रिमाची रक्कम १४ एप्रिल २०२६ पूर्वी अदा करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

> “ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, सामाजिक न्याय आणि प्रगतीचा दिलेला संदेश आजही आपल्या कामकाजाला दिशा देणारा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सण अग्रिम देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचाही एक प्रयत्न आहे.
>
> — डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## रेल्वे स्टेशन परिसरात कारवाई; तीन लाखांचा मुद्देमाल जप्त, गुन्हे शाखेची धडक मोहीम

# चिंचवडमध्ये ६ किलो गांजासह आरोपी अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात अंमली पदार्थांविरोधातील कारवायांना वेग आला असून चिंचवड परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ६ किलो ५५ ग्रॅम गांजासह एका आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने केली असून शहरात पुन्हा एकदा अंमली पदार्थांच्या साखळीवर मोठा आघात झाल्याचे मानले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळच्या सुमारास चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीत दळवीनगर ते लोकमान्य हॉस्पिटल मार्गावर, चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ संशयित हालचाली सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने सापळा रचून कारवाई करत आरोपी जवाहर अर्जुनदास रामनानी (वय ६८, रा. पिंपरी) याला ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून सुमारे ३ लाख ३ हजार रुपये किमतीचा मोबाईल तसेच ६ किलो ५५ ग्रॅम वजनाचा गांजा असा एकूण मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा गांजा विक्रीसाठी बेकायदेशीररित्या साठवून ठेवला असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक झिंझुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

शहरात वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यवहारांवर आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने मोहीम राबवली जात आहे. या कारवाईमुळे अंमली पदार्थांच्या विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत त्वरित पोलिसांना माहिती द्यावी,

# जमीन व्यवहारातून २६ लाखांची फसवणूक; दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव मावळ :** जमीन व्यवहाराच्या नावाखाली तब्बल २६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे मावळ तालुक्यातील आढले खुर्द परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय पांडुरंग नरोडे (वय ५५, रा. औंध, पुणे) हे रिअल इस्टेट व्यवसायिक असून त्यांनी आढले खुर्द येथील गट क्रमांक २५५ मधील सुमारे १५,००० चौरस फूट जागेच्या खरेदीसाठी आरोपींशी करार (एमओयू) केला होता. मात्र, ऑक्टोबर २०२० पासून आजपर्यंत संबंधित जागेचे खरेदीखत करून देण्यात आले नसल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आरोपी मोहन जयंवत येवले (वय ५८) आणि सौ. आशा मोहन येवले (वय ५१, दोघे रा. आढले खुर्द, ता. मावळ) यांनी फिर्यादीकडून मोठी रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. आरोपी क्रमांक २ यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र खात्यावर आरटीजीएसद्वारे २० लाख रुपये तर आरोपी क्रमांक १ यांनी रोख स्वरूपात ६ लाख रुपये घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तसेच, पैसे घेतल्यानंतरही व्यवहार पूर्ण न करता उलट फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (२), ३५१ (२), ३५२ आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पारखे करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भिगवणमध्ये क्रीडांगणाचा अभाव; तरुणाईचा संताप

**भिगवण :** सुमारे २५ हजार लोकसंख्या असलेल्या भिगवणमध्ये सुसज्ज क्रीडांगणाचा अभाव असल्याने तरुणाईसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. गावात उपलब्ध असलेले एकमेव मैदान अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले असून, जागाही अपुरी पडत आहे. त्यामुळे खेळाडूंना नियमित सरावासाठी आवश्यक सुविधा मिळत नाहीत. काही वर्षांपूर्वी भिगवणमध्ये क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात होत असत. मात्र कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विस्तारामुळे खेळासाठी वापरली जाणारी जागा उपलब्ध राहिलेली नाही. परिणामी, अनेक होतकरू खेळाडू संधीपासून वंचित राहत आहेत.
क्रीडांगण हे तरुणांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी महत्त्वाचे केंद्र असते. मात्र मैदानाच्या अभावामुळे तरुणाई मैदानी खेळांपासून दूर जात असून मोबाईल व आभासी जगाकडे वळत असल्याची खंत व्यक्त होत आहे.

### शिरूर-चौफुला महामार्गावर भीषण अपघात

**न्हावरे :** शिरूर-चौफुला महामार्गावर आंबळे परिसरात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. रस्त्यावर निष्काळजीपणे उभ्या केलेल्या ट्रकला दुचाकीची जोरदार धडक बसल्याने हा अपघात घडला. पोलीस माहितीनुसार, मानकेश्वरी लॉन्ससमोर ट्रक (क्र. एमएच-16 सीसी-9779) कोणतेही इशारा चिन्ह किंवा रिफ्लेक्टर न लावता उभा करण्यात आला होता. दरम्यान, कारेगाव येथील सूर्यकांत सूर्यवंशी (वय ४०) आणि दिनेश राम हे दुचाकीवरून जात असताना अंधारामुळे त्यांना ट्रकचा अंदाज आला नाही आणि त्यांनी पाठीमागून धडक दिली. या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालकाने मदत न करता वाहनासह घटनास्थळावरून पलायन केले.

---

### होमी भाभा केंद्र, नेहरू तारांगण व राजभवन भेटीतून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन बळकट

# 'आंबेगावातील विद्यार्थ्यांची मुंबईत वैज्ञानिक सहल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभाग, आयुका वेधशाळा गिरवली आणि आयुका पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, मोरडे फुड्स प्रा. ली. मंचर यांच्या सहकार्याने 'आंबेगाव सुपर 23' उपक्रमातील निवडक विद्यार्थ्यांची वैज्ञानिक सहल मुंबई येथे उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, जिज्ञासा वाढवणे आणि कल्पकतेला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी दिली.

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आयुकाचे संचालक डॉ. रघुनाथन श्रीआनंद, विज्ञान प्रसार अधिकारी समीर धुर्डे, शिक्षण अधिकारी संजय नाईकडे आणि गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली या सहलीचे नियोजन करण्यात आले होते.

सहलीच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी मुंबईतील होमी भाभा विज्ञान केंद्राला भेट दिली. येथे संस्थेचे संचालक शास्त्रज्ञ डॉ. अर्नब भट्टाचार्य यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विज्ञानातील विविध संकल्पना सोप्या भाषेत स्पष्ट केल्या. चंद्राच्या कला, पृथ्वीवरील त्याचा परिणाम यासारख्या विषयांवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. सायंकाळी दुर्बिणीद्वारे गुरु, शुक्र आणि चंद्राचे निरीक्षण करताना विद्यार्थ्यांना 'आकाश दर्शन'चा अविस्मरणीय अनुभव मिळाला.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी देशातील सर्वात मोठ्या परस्परसंवादी विज्ञान केंद्राला भेट देत 'सायन्स ओडिसी' आणि 'थ्रीडी शो'चा आनंद घेतला. जैवविविधता, सूर्यमाला, अणुऊर्जा प्रकल्प यांसारख्या विषयांवरील सादरीकरणांमुळे विद्यार्थ्यांची विज्ञानाबद्दलची आवड अधिक वाढली. यानंतर नेहरू तारांगण येथे विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचा सखोल परिचय मिळाला. संचालक डॉ. अरविंद परांजपे यांनी ग्रह, तारे आणि अंतराळ याविषयी सुलभ भाषेत माहिती दिली. डिजिटल प्रक्षेपण, 'नो युवर स्टार्स' उपक्रम आणि चंद्रयान मोहिमेवरील सादरीकरणांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अंतराळात भ्रमंती केल्याचा अनुभव आला.

सहलीच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी मुंबईतील ऐतिहासिक राजभवनाला भेट दिली. दरबार हॉल, राज्यपालांचे अधिकार आणि संविधानिक महत्त्व याबाबत माहिती घेतली. ब्रिटिशकालीन बंकर आणि भूमिगत संग्रहालय पाहताना विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमानाची भावना अधिक दृढ झाली.

या उपक्रमासाठी राज्यपालांचे सचिव उमेश काशीकर, आरोग्य विभागाचे सचिव मंगेश शिंदे तसेच विविध संस्थांचे मान्यवर यांचे सहकार्य लाभले. सहलीचे नियोजन रूपाली धोका, निलेश पोखरकर, शैला निमसे, कल्पना टाकळकर आणि नीलकंठ कोरडे यांनी केले. गरीब व गरजू विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'आंबेगाव सुपर 23' या उपक्रमाचे पालक व शिक्षकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांसाठी ही सहल प्रेरणादायी ठरत असून त्यांच्या ज्ञानविश्वाला नवी दिशा देणारी ठरली आहे.

---

## मैसूर विद्यापीठात 'विविधतेत एकता'चा संदेश; महाराष्ट्र संघाचे दमदार प्रतिनिधित्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** कर्नाटक राज्यातील मैसूर विद्यापीठ येथे पार पडलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिर २०२५-२६ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या संघाने महाराष्ट्र राज्याचे प्रभावी प्रतिनिधित्व केले. तामिळनाडू, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, गोवा, तेलंगणा आणि कर्नाटक या सहा राज्यांतील स्वयंसेवकांच्या सहभागातून 'विविधतेत एकता'चा संदेश या शिबिरातून प्रभावीपणे देण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाले. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित प्रेरणादायी व्याख्यानांमधून स्वयंसेवकांना राष्ट्रसेवा, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. शिबिरादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोकनृत्य, गीत सादरीकरण तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र संघाने सादर केलेल्या वारी आणि गणेशोत्सवावर आधारित लोकनृत्यांनी उपस्थितांची विशेष दाद मिळवली. विविध राज्यांच्या परंपरा, संस्कृती आणि जीवनशैलीचा संगम अनुभवण्याची संधी या शिबिरातून स्वयंसेवकांना मिळाली. या शिबिरात प्रा. दिलीप घुले, दिक्षा तुपेरे, अक्षदा पाचुंदकर, पूजा भामे, सिद्धी गावडे, महादेव स्वामी, श्रावणी पाटील, आदित्य बोरसे, मद्रे दिलीप, ओम पवार आणि सोहम आव्हाड या स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. शिबिरात स्वच्छता अभियान, समूह चर्चा, नेतृत्व विकास उपक्रम आणि सामाजिक विषयांवरील मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाली असून राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. गणेश भामे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. शिबिरातील अनुभव स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला.

---

## उन्हाळ्याच्या तडाख्यात पारगाव आठवडे बाजारात माठांना उस्फूर्त मागणी

### नैसर्गिक थंड पाण्याच्या शोधात नागरिकांचा कल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे भरविण्यात येणाऱ्या शुक्रवारीच्या आठवडे बाजारात यंदा मातीच्या माठांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे थंड पाण्यासाठी नागरिकांनी पुन्हा पारंपरिक पर्यायाकडे वळत माठांची खरेदी वाढवली आहे.

अलीकडच्या काही आठवड्यांत तापमानात झपाट्याने वाढ झाल्याने बाजारात माठ खरेदीसाठी ग्राहकांची लक्षणीय गर्दी होत आहे. विविध आकार, रंगसंगती आणि आकर्षक नक्षीकाम असलेले माठ ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. पारंपरिक डिझाइनसोबतच आधुनिक शैलीतील माठही बाजारात उपलब्ध असल्याने ग्राहकांना विविध पर्याय मिळत आहेत.

**नैसर्गिक थंडावा आणि आरोग्याचा विचार**

फ्रीजच्या पाण्याच्या अतिवापरामुळे होणाऱ्या आरोग्य समस्यांबाबत जागरूकता वाढल्याने अनेक नागरिक माठातील पाणी पिण्याला प्राधान्य देत आहेत. मातीच्या माठात पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते, ते शरीराला सहज पचते आणि उष्णतेत शरीराचे संतुलन राखण्यास मदत करते. त्यामुळे ग्रामीण भागासोबतच शहरी नागरिकही माठ खरेदीकडे आकर्षित होत आहेत.

**व्यापाऱ्यांना चांगला प्रतिसाद**

माठ विक्रीसाठी आलेल्या व्यापाऱ्यांनी सांगितले की, यंदा अपेक्षेपेक्षा जास्त मागणी वाढली आहे. सकाळपासूनच ग्राहकांनी खरेदीसाठी रांगा लावल्या असून १५० ते ४०० रुपयांदरम्यान विविध प्रकारचे माठ उपलब्ध आहेत. अनेकांनी एकाच वेळी दोन ते तीन माठ

---

## पारगाव कारखाना पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

### १.८० लाखांचे १२ मोबाईल तक्रारदारांना परत; तांत्रिक तपास पथकाच्या प्रयत्नांना यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईल शोध मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करत नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. मार्च २०२६ दरम्यान गहाळ झालेले सुमारे १ लाख ८० हजार रुपये किमतीचे एकूण १२ मोबाईल शोधून ते मूळ तक्रारदारांना परत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेस गती देण्यात आली. त्यांनी विशेष पथक स्थापन करून हद्दीतील हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, पोलीस अंमलदार मंगेश अभंग आणि संजय साळवे यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे मोबाईल शोध मोहीम राबवली.

तपासादरम्यान मोबाईल मिळालेल्या व्यक्तींशी संपर्क साधून आवश्यक माहिती गोळा करण्यात आली. चिकाटी, संयम आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर या पथकाने हरवलेले मोबाईल हस्तगत करण्यात यश मिळवले. नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या हस्ते हे मोबाईल संबंधित तक्रारदारांना परत देण्यात आले.

या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला असून, हरवलेले साहित्य परत मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे, पारगाव कारखाना पोलीस ठाण्याने २०२५-२६ या कालावधीत आतापर्यंत एकूण ३७ मोबाईल शोधून तक्रारदारांना परत दिले आहेत.

सदर मोहीम पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कांडगे यांनी सांगितले. पोलिसांच्या या तत्परतेमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होत असून, पारगाव कारखाना पोलीस ठाण्याची ही कामगिरी कौतुकास्पद ठरत आहे.

---

## भ्रष्टाचार निवारण समितीच्या खेड तालुका अध्यक्षपदी शंकरराव वर्पे पाटील

### आळंदी येथे पदग्रहण सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** महाराष्ट्र राज्य भ्रष्टाचार निवारण समितीच्या खेड तालुका अध्यक्षपदी शंकरराव वर्पे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून उपाध्यक्षपदी कैलासराव घेनंद पाटील यांची निवड करण्यात आली आहे. आळंदी येथील सुयश सभागृहात पार पडलेल्या पदग्रहण व नियुक्तीपत्र वितरण सोहळ्यात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांना अधिकृत नियुक्तीपत्रे देण्यात आली.

माजी न्यायाधीश भूषण गवई यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी आणि समाजात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य भ्रष्टाचार निवारण समिती कार्यरत असून, या नियुक्त्या संघटनेच्या बळकटीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल मानल्या जात आहेत. या नियुक्ती प्रक्रियेत उपाध्यक्ष विकास डोळस, जनार्दन इंगळे, पुणे शहर कार्याध्यक्ष गिरीश घोगरे, तसेच पुणे जिल्हाध्यक्ष यांनी पुढाकार घेतला. अण्णाराजे शिवले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या सोहळ्यात खेड तालुक्यासह इतर तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांचीही घोषणा करण्यात आली. पुरंदर तालुका अध्यक्षपदी दादासाहेब खटाटे, दौंड तालुका अध्यक्षपदी रोहित भोसले, शिरूर तालुका अध्यक्षपदी हरिचंद्र खैरे, हवेली तालुका अध्यक्षपदी गणेश वागस्कर यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच विविध तालुक्यांतील उपाध्यक्ष पदांवरही नियुक्त्या करण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान समितीच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटनही करण्यात आले. या वेळी माजी सभापती रामदास ठाकूर पाटील, उपसरपंच दत्तात्रय वर्पे, सुनील वर्पे, चेअरमन नारायण वर्पे, तुकाराम वहिले, राजाराम लोखंडे, पांडाशेठ गावडे पाटील, रमेश गोडसे, भगवान लोखंडे, विलास काकडे, विजय ठाकूर पाटील

---

## लोणी काळभोरमध्ये कुस्तीचा महासंग्राम; ३० लाखांची बक्षिसे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** येथील श्रीमंत अंबरनाथ यात्रेनिमित्त आयोजित जंगी कुस्ती आखाड्यात राज्यातील नामांकित मल्लांच्या उपस्थितीत कुस्तीप्रेमींना थरारक लढतींचा अनुभव मिळाला. सुमारे ३० लाख रुपयांची रोख बक्षिसे, आकर्षक नियोजन आणि हजारोंच्या उपस्थितीमुळे हा आखाडा विशेष ठरला. या आखाड्यातील प्रमुख लढत महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यात रंगली. ही २ लाख २१ हजार रुपयांची कुस्ती अत्यंत चुरशीची होऊन अखेर बरोबरीत सुटली. दुसऱ्या क्रमांकाच्या लढतीत हिंदकेसरी विक्रांत कुमारने दीपक हुडाला पराभूत केले. तर शिवराज राक्षे आणि जयदीप पाटील यांनीही आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजय मिळवला.

---

## काठापूर बुद्रुक शाळेला 'ग्रीन स्कूल अवार्ड २०२५'मध्ये तृतीय

### टाटा मोटर्स (बिकन) तर्फे सन्मान; दोन लाखांचे शालेय साहित्य व सन्मानचिन्ह प्रदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) या शाळेला 'ग्रीन स्कूल अवार्ड २०२५'मध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. पुण्यात आयोजित समारंभात टाटा मोटर्स (बिकन) व पर्यावरण शिक्षण संस्थेच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारांतर्गत शाळेला सुमारे दोन लाख रुपयांचे शालेय साहित्य तसेच सन्मानचिन्ह देण्यात आले. टाटा मोटर्सचे पदाधिकारी सिताराम कांडी, सुनील तिवारी, निरज अग्रवाल, सतीश आवटे आणि पूजा शेळकंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात पुरस्कार स्वीकारला.

'ग्रीन स्कूल अवार्ड २०२५' स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सरकारी तसेच खासगी शाळांनी सहभाग घेतला होता. ग्रामीण विभागातील सरकारी शाळांच्या गटात १५९ शाळांनी सहभाग नोंदवला होता. यापैकी अंतिम पाच शाळांची निवड करून त्यांना क्रमांक देण्यात आले. या स्पर्धेत काठापूर बुद्रुक शाळेने तृतीय क्रमांक पटकावत आपली वेगळी छाप पाडली. शाळेने परिसरात केलेली वृक्षलागवड, पर्यावरण रक्षण, प्लास्टिकमुक्त उपक्रम, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता आणि बगीचा निर्मिती यांसारख्या उपक्रमांचे सखोल मूल्यमापन करून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सातत्याने काम केल्यामुळेच शाळेला हा मान मिळाल्याचे मानले जात आहे.

पुरस्कार स्वीकृतीवेळी मुख्याध्यापक नंदकुमार चासकर, शिक्षक उत्तम वाव्हळ, दिनेश तूळे, निलीमा वळसे, कविता कोठावळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर शेटे, राजू जोरी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

---

### भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजरात सोहळ्याची सांगता; हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी

# हजेरी मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** आळंदीतील ग्रामदैवत श्री हजेरी मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने आयोजित या सोहळ्याची सांगता हरिनामाच्या जयघोषात आणि गावकरी भजन सेवेने मंगलमय वातावरणात झाली.

जन्मोत्सवानिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. हनुमान जयंतीच्या दिवशी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मंदिरात हजेरी लावत मारुतीरायांचे दर्शन घेतले. भक्तांनी श्रीफळ अर्पण करून पूजा केली, तर उपस्थितांना दूध प्रसादाचे वाटप करण्यात आले.

या उत्सवात कीर्तनकार सोमनाथ महाराज भालेकर यांनी सुश्राव्य कीर्तन सेवा सादर केली. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांचा मंडळाच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

गावकरी भजनी मंडळाच्या भजन सेवेने रात्री उशिरापर्यंत वातावरण भक्तिमय ठेवले. संपूर्ण आळंदी परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण होते. नवशिवशक्ती तरुण मंडळाने भाविकांसाठी विविध सेवा-सुविधा पुरवून आयोजनात मोलाची भूमिका बजावली.

या सोहळ्याचे नियोजन माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिंद्र शेंडे, शांतता समिती सदस्य डी. डी. भोसले पाटील, वारकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच, श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम असलेला हा हनुमान जन्मोत्सव आळंदीकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

---

## ट्रक आणि स्कूटर बाईकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** ट्रक आणि स्कूटर,बाईकच्या धडकेत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी दि.३ रोजी अहिल्यानगर- कल्याण महामार्गावर ओतूर येथील धोलवड चौकात सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.
स्नेहल रोहिदास अहिनवे वय २८ वर्षे,रा.ओतूर (अहिनवेवाडी,ता. जुन्नर,जि.पुणे) असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे.
याबाबत समजलेली माहिती अशी की,स्नेहल अहिनवे या त्यांचे सासरे दत्तात्रय कुशाबा अहिनवे यांच्या स्कूटर बाईकवर पाठीमागे बसून अहिल्यानगर कल्याण महामार्गावरून बनकर फाटा बाजूकडून ओतूरकडे येत असताना त्याच बाजूकडून पाठीमागून येणारा ट्रक क्रमांक एम.एच.१६ सी.सी.६०६४ चा ओतूर येथील धोलवड फाटा चौकात सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास दुचाकी स्कूटर बाईकला धक्का लागून स्नेहल अहिनवे हिचा ट्रक खाली पडल्याने मृत्यू झाला तर या अपघातात मृत स्नेहल यांचे सासरे दत्तात्रय अहिनवे हे किरकोळ जखमी झाले आहेत.ओतूर पोलीसांनी ट्रक चालकास ताब्यात घेतले असल्याचे समजते.अपघात झाल्यावर या ठिकाणी मोठी गर्दी झाली होती.

## सारांश वृत्त

### सोन्या चांदीमध्ये महिन्याभरापासून चढउतार

**जबलपूर:** गेल्या महिन्याभरापासून सोने चांदीच्या दारात प्रचंड चढ-उतार सुरू आहेत . परिणामी ग्राहकांना सोनं खरेदी करावं की नाही हा संभ्रम कायम आहे. जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता, मध्यपूर्व भागातील तणाव, युद्धासंबंधी होणारे निर्णय, घोषणा या सगळ्याच्या परिणामामुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याचा आधार घेताना दिसत आहेत. दरम्यान महिनाभरापासून सोन्या चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळतेय. महिनाभरापूर्वी एक लाख 61 हजार 800 रुपयांवर असणाऱ्या सोन्याचा भाव मागच्या आठवड्यात 1 लाख 45 हजार रुपयांवर पोहोचला. काल (2 एप्रिल ) 24 कॅरेट सोन्याचा प्रति 10 ग्रॅम दर 1 लाख 52 हजार 490 रुपयांवर होता. चांदीचे दरही गेल्या महिन्याभरापासून घसरताना दिसत आहेत. महिनाभरापूर्वी 2 लाख 65,880 रुपयांवर असणारी चांदी आठवड्याभरापूर्वी दोन लाख 27 हजार 930 रुपयांवर पोहोचली होती. आज चांदीचा किलोमागे दर 2 लाख 32 हजार 900 रुपये झालाय.


### पाकिस्तानात पेट्रोल दरांचा ‘रोलरकोस्टर

**कराची** : पाकिस्तानमध्ये इंधन दरांमध्ये मोठी चढ-उतार पाहायला मिळत असून, नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा परिणाम म्हणून पेट्रोलच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली होती. युद्ध सुरू झाल्यापासून देशात पेट्रोलचा दर तब्बल ३७८ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचला असून, एकूण वाढ सुमारे ५० टक्क्यांपर्यंत गेली आहे. दरम्यान, इंधन दरवाढीमुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या नागरिकांवर मोठा आर्थिक ताण आला होता. वाहतूक, अन्नधान्य आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीतही वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, आश्चर्यकारक घडामोडीत, सरकारने पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीच्या घोषणेनंतर अवघ्या एका दिवसातच पेट्रोलच्या किमतीत ८० रुपयांची कपात जाहीर केली. या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे बाजारात आणि सामान्य नागरिकांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## इराणची ठाम भूमिका स्पष्ट; अमेरिकेच्या अटींवर तीव्र आक्षेप

# युद्धविरामासाठी जागतिक हालचाली तीव्र!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्रायल आणि इराण आणि यांच्यातील संघर्ष आज ३६ व्या दिवशी पोहोचला असून पश्चिम आशियातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. सातत्याने सुरू असलेल्या लष्करी कारवायांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाल्याचे वृत्त आहे. विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार हजारो नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक भागांत मानवतावादी संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर युद्ध थांबवण्यासाठी जागतिक स्तरावर राजनैतिक हालचालींना वेग आला आहे.

या संघर्षात मध्यस्थीची भूमिका बजावत असलेल्या Pakistan कडून शांतता प्रयत्न सुरू असून इराणने या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पाकिस्तानकडून दोन्ही बाजूंमध्ये संवाद प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या प्रयत्नांमध्ये अजूनही ठोस यश मिळालेले नाही, असे राजनैतिक वर्तुळात मानले जात आहे.

इराणचे परराष्ट्रमंत्री हुसेन अमिर अब्दुल्लाह यांनी इराणची भूमिका स्पष्ट करताना अमेरिकन माध्यमांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले की, “अमेरिकन माध्यमे आमची भूमिका चुकीच्या पद्धतीने जगासमोर मांडत आहेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गैरसमज निर्माण करत आहेत.” तसेच त्यांनी पाकिस्तानच्या मध्यस्थी प्रयत्नांचे खुलेपणाने कौतुक केले.

परराष्ट्रमंत्र्यांनी पुढे सांगितले की, इराणने कधीही संवादाचा मार्ग बंद केलेला नाही. “आम्ही चर्चेसाठी इस्लामाबादला जाण्यास कधीही नकार दिलेला नाही. आम्ही नेहमीच चर्चेसाठी तयार आहोत, परंतु आमच्यावर लादण्यात येणाऱ्या अवैध अटी आम्हाला मान्य नाहीत,” असे त्यांनी स्पष्ट केले. या वक्तव्यानंतर इराणची भूमिका काही प्रमाणात लवचिक असल्याचे संकेत मिळत असले तरी युद्धविरामाबाबत मोठी अडचण कायम असल्याचे दिसते.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायल यांच्याकडून सुरू असलेल्या कारवायांमुळे तणाव अधिक वाढत असल्याचे चित्र आहे. इराणकडूनही त्याला तितक्याच तीव्रतेने प्रत्युत्तर दिले जात असल्याने संघर्ष चक्रवाढ पद्धतीने वाढत आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असून अनेक भागांत अन्न, पाणी आणि आरोग्यसेवेचा तुटवडा निर्माण झाला आहे.

या संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित नसून जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजार आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावरही मोठा परिणाम होत आहे. विशेषतः कच्च्या तेलाच्या किंमती आणि पुरवठा साखळीवर दबाव वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे जगभरातील देश युद्ध थांबवण्यासाठी अधिक सक्रिय भूमिका घेत असल्याचे दिसत आहे.

पाकिस्तानच्या मध्यस्थी प्रयत्नांना सुरुवातीला अपयश आल्याच्या चर्चा होत्या, मात्र इस्लामाबादने त्या दाव्यांना फेटाळले आहे. सध्या पाकिस्तान पुन्हा एकदा दोन्ही बाजूंना चर्चेच्या टेबलावर आणण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांना यश मिळते का, याकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागले आहे. तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवस अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. जर राजनैतिक तोडगा निघाला नाही तर संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जगभरातील प्रमुख शक्ती शांतता प्रस्थापनेसाठी दबाव वाढवत आहेत. सध्या तरी सर्वांचे लक्ष इराणची पुढील भूमिका, अमेरिकेची रणनीती आणि पाकिस्तानच्या मध्यस्थी प्रयत्नांवर केंद्रित झाले आहे.

## पश्चिम आशियातून ४२ विमानसेवा सुरू; प्रवाशांना दिलासा

### एअर इंडिया एक्सप्रेसचा उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांसाठी दिलासादायक निर्णय घेत, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या विमान कंपन्यांनी ४२ विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. या सेवा पश्चिम आशिया प्रदेशातून ये-जा करणाऱ्या अनुसूचित तसेच अनियोजित उड्डाणांचा समावेश करतात.

एअरलाइन्सकडून शनिवारी (४ एप्रिल) जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार, एकूण ४२ उड्डाणे संयुक्तपणे चालवली जाणार आहेत. यामध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथून ये-जा करणाऱ्या २६ अनियोजित विमानसेवांचा समावेश आहे. मात्र या उड्डाणांचे संचालन संबंधित विमानतळांवरील स्लॉट उपलब्धता आणि स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असेल.

कंपनीने स्पष्ट केले की, सर्व सेवा भारत आणि यूएईमधील नियामक प्राधिकरणांच्या आवश्यक परवानग्या घेऊनच सुरू करण्यात येत आहेत. तसेच, बाधित प्रवाशांशी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला जाणार असून, त्यांना पुनर्बुकिंगसंदर्भात माहिती दिली जाईल. प्रवाशांनी आपले संपर्क तपशील अद्ययावत ठेवावेत, असे आवाहन एअरलाइन्सने केले आहे. त्यामुळे त्यांना उड्डाणांबाबतच्या ताज्या सूचना आणि पर्यायी प्रवास पर्याय वेळेवर मिळू शकतील. दरम्यान, उत्तर अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया आदी इतर मार्गांवरील एअर इंडियाच्या नियमित सेवा नियोजित वेळापत्रकानुसार सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या प्रवाशांच्या उड्डाणांवर परिणाम झाला आहे, त्यांना अधिकृत वेबसाइटवरून पुनर्बुकिंग किंवा पूर्ण परतावा मिळवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## १६७ कोटींच्या पेंटिंगनंतर पुन्हा चर्चेत पुनावाला कुटुंब; सुनेच्या गुलाबी हिऱ्याची अंगठी चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोची** : अलिकडेच सायरस पुनावाला यांच्या कुटुंबाने राजा रवी वर्मा यांच्या दुर्मिळ पेंटिंगसाठी तब्बल १६७ कोटी रुपये मोजत चर्चेत प्रवेश केला होता. आता पुन्हा एकदा हे कुटुंब चर्चेत आले आहे, यावेळी कारण आहे त्यांची सून Natasha Poonawalla हिच्याकडे असलेली तब्बल १२६ कोटी रुपयांची दुर्मिळ गुलाबी हिऱ्याची अंगठी.

नताशा पुनावाला तिच्या लक्झरी लाइफस्टाइल आणि स्टेटमेंट फॅशनसाठी नेहमीच चर्चेत असते. अलीकडेच एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात तिच्या हातातील ही दुर्मिळ अंगठी विशेष आकर्षण ठरली. ज्वेलरी तज्ज्ञांच्या मते, या अंगठीत १०.३८ कॅरेटचा पिंक आणि पर्पल डायमंड जडवलेला असून त्याभोवती आणखी हिरे बसवण्यात आले आहेत. या अंगठीचे डिझाइन प्रसिद्ध ज्वेलर जार यांनी केले असून त्याला ब्लॅक प्लॅटिनम फिनिश देण्यात आला आहे. या अंगठीची खासियत म्हणजे तिचा ऐतिहासिक वारसा. ही अंगठी फ्रान्सची शेवटची महाराणी मारी अँन्थॉनी हिच्याकडे असल्याचे सांगितले जाते. तिच्यानंतर ती शाही घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या जपली गेली. १९९६ मध्ये लिलावात विकली गेलेली ही अंगठी २०२५ मध्ये न्यूयॉर्कमधील लिलावात तब्बल १३ दशलक्ष डॉलरला विकली गेली होती. या हिऱ्याचे भारताशीही खास नाते आहे.

# ‘हिंदी सक्ती’ आरोपांवर केंद्राची पलटवार

### बहुभाषिकतेला प्रोत्साहनच उद्दिष्ट – केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) आणि तीन-भाषा सूत्रावरून केंद्र आणि तामिळनाडू सरकारमध्ये वाद अधिक तीव्र झाला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या ‘हिंदी सक्ती’च्या आरोपांना फेटाळत, हे धोरण लवचिक असून बहुभाषिकतेला चालना देणारे असल्याचे स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारच्या मते, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत तीन-भाषा सूत्र लागू करण्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांना अधिक भाषिक कौशल्ये देणे हा आहे. विशेषतः CBSEच्या शाळांमध्ये सहावीपासून हे धोरण लागू करण्याची योजना आहे. मात्र, यावर तामिळनाडू सरकारने तीव्र विरोध दर्शवला असून, हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, “एका लवचिक धोरणाला ‘अनिवार्य हिंदी’ म्हणून सादर करणे चुकीचे आहे. यामुळे तामिळ विद्यार्थ्यांचे संरक्षण होत नाही, उलट त्यांना बहुभाषिक आणि जागतिक स्तरावर सक्षम होण्याच्या संधींपासून वंचित ठेवले जाते.” त्यांनी पुढे असेही नमूद केले की, इतर भाषा शिकल्याने तामिळ भाषा कमकुवत होत नाही, तर ती अधिक समृद्ध होते. प्रधान यांनी या आरोपांना “राजकीय हेतूने केलेले” असल्याचे सांगत, राष्ट्रीय शिक्षण धोरणाला “भाषिक मुक्ततेचे घोषणापत्र” असे संबोधले. या धोरणात मातृभाषेला प्राधान्य दिले असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ भाषेत शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या धोरणात केवळ भाषांपुरतेच नव्हे तर शिक्षणाच्या एकूण गुणवत्तेवर भर देण्यात आला आहे. शिक्षक प्रशिक्षण, DIETs सारख्या संस्थांचे बळकटीकरण, तसेच NPST आणि NMM सारख्या राष्ट्रीय आराखड्यांद्वारे शिक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी अधिक सक्षम करण्यावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. नरेंद्र मोदी यांनीही तामिळ भाषेचे कौतुक करत तिला “राष्ट्रीय संपत्ती” म्हणून गौरविल्याचा उल्लेख प्रधान यांनी केला. ‘काशी-तामिळ संगमम’सारख्या उपक्रमांद्वारे तामिळ संस्कृतीचा गौरव करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# ट्रम्प यांचा इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची चिन्हे दिसत असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा कठोर इशारा दिला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी तातडीने खुली न केल्यास पुढील ४८ तासांत “नरकासमान आपत्ती” ओढवेल, असा इशारा त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून दिला आहे.

ट्रम्प यांनी यापूर्वीही इराणला सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ६ एप्रिलपर्यंतची मुदत दिली होती. ही मुदत आता संपत आल्याचे सांगत त्यांनी पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतली आहे. “करार करा किंवा सामुद्रधुनी खुली करा,” असे स्पष्ट शब्दांत त्यांनी इराणला सुनावले.

दरम्यान, या तणावात भर घालत इराणने अमेरिकेची दोन लढाऊ विमाने पाडल्याचा दावा केला आहे. तसेच काही अमेरिकन सैनिकांना ताब्यात घेतल्याचेही इराणी लष्कराने म्हटले आहे. या सैनिकांच्या सुटकेसाठी गेलेल्या अमेरिकन ब्लॅक हॉक हेलिकॉप्टरवरही हल्ला केल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनांमुळे परिस्थिती अधिकच चिघळली आहे. महत्त्वाचे म्हणजे, होर्मुझची सामुद्रधुनी हा जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. जगातील सुमारे २० टक्के तेलवाहतूक या मार्गातून होते. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणने हा मार्ग बंद केला होता. त्यानंतर जागतिक बाजारपेठेत ऊर्जा टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## होर्मुझ संकटावर भारताची पर्यायी रणनीती

# दुसरे मिडल ईस्ट तयार करण्याची तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे होर्मुझची सामुद्रधुनीत गंभीर अडथळे निर्माण झाले असून, जागतिक इंधन पुरवठ्यावर त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतने ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली असून, अमेरिकेच्या मेक्सिकोचा आखात परिसरात ‘दुसरे मिडल ईस्ट’ तयार करण्याची रणनीती आखली जात आहे.

मध्यपूर्वेतील तणावामुळे होर्मुझ मार्गावर बॉटलनेक निर्माण झाला आहे. या मार्गातून जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाची वाहतूक होते. त्यामुळे या मार्गातील अडथळ्यांमुळे अनेक देशांमध्ये इंधन टंचाई आणि दरवाढीची समस्या निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत भारतासारख्या वाढत्या अर्थव्यवस्थेला स्थिर आणि सुरक्षित ऊर्जा पुरवठ्याची गरज अधिक तीव्र झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या गल्फ भागात खोल समुद्रातील तेल आणि गॅस साठ्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास केला जात आहे. या ‘अल्ट्रा-डीप वॉटर’ प्रकल्पांमध्ये जगातील आघाडीच्या ऊर्जा कंपन्या गुंतवणूक करत आहेत. ‘शेननडोह’सारख्या प्रकल्पांमध्ये ५१ टक्के हिस्सेदारी विक्रीसाठी उपलब्ध होण्याची शक्यता असून, येत्या काही आठवड्यांत बोली प्रक्रिया होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पांचे वैशिष्ट्य म्हणजे समुद्राच्या सुमारे ३०,००० फूट खोलीवर असलेले प्रचंड साठे. अत्यंत उच्च दाब (२०,००० PSI पर्यंत) असतानाही येथे यशस्वीपणे उत्खनन सुरू आहे. सध्या दररोज सुमारे १ लाख बॅरल तेल उत्पादन होत असून, पुढील काळात ही क्षमता वाढवण्याची योजना आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हा भाग युद्धग्रस्त मध्यपूर्वेपासून हजारो किलोमीटर दूर असल्याने पुरवठा साखळी अधिक सुरक्षित राहणार आहे. त्यामुळे भारताला होर्मुझसारख्या धोकादायक आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील मार्गांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल. तज्ज्ञांच्या मते, भारताची ऊर्जा गरज वेगाने वाढत आहे. एलपीजीपासून पेट्रोल-डिझेलपर्यंत सर्वच इंधनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा

# दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतात ५.९ तीव्रतेचा भूकंप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतातील अनेक भागांत शुक्रवारी (३ एप्रिल) रात्री ९:४२ वाजता भूकंपाचे जोरदार झटके जाणवले. चंदीगड, हिमाचल प्रदेश, तसेच जम्मू-कश्मीरमधील विविध भागांमध्येही जमीन हलल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.९ इतकी नोंदवण्यात आली असून त्याचे केंद्र अफगाणिस्तान-तजाकिस्तान सीमा परिसरात असल्याची माहिती समोर आली आहे. भूकंपाचे झटके जाणवताच अनेक नागरिकांनी तातडीने घराबाहेर धाव घेतली. विशेषतः उंच इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांना झटके अधिक तीव्रतेने जाणवले. काही ठिकाणी नागरिक पार्क आणि मोकळ्या जागेत एकत्र जमले. उधमपूर, पुंछ आणि काश्मीर खोऱ्यातील भागांमध्येही काही सेकंद झटके जाणवले. तसेच पाकिस्तानमधील इस्लामाबाद, पंजाब आणि पेशावर येथेही भूकंपाचे परिणाम दिसून आले.

सुदैवाने, या भूकंपात अद्याप कोणतीही मोठी जीवितहानी किंवा गंभीर नुकसान झाल्याची माहिती नाही. प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता सुरक्षिततेचे नियम पाळावेत आणि अफवांपासून दूर राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दरम्यान, भूकंपानंतर अनेक नागरिकांनी सोशल मीडियावर आपले अनुभव शेअर केले. अचानक पंखे, फर्निचर आणि खिडक्या हलल्याचे अनेकांनी सांगितले. शास्त्रीय माहितीनुसार, पृथ्वीच्या आतील टेक्टॉनिक प्लेट्स सतत हालचाल करत असतात. या प्लेट्स एकमेकांवर आदळल्याने, घासल्याने किंवा दूर गेल्याने निर्माण होणाऱ्या ऊर्जा लहरींमुळे भूकंप होतो. भूकंपाची तीव्रता मोजण्यासाठी ‘रिश्टर स्केल’चा वापर केला जातो. या स्केलवर १ ते ९ पर्यंत तीव्रता मोजली जाते. तीव्रता जितकी जास्त, तितका भूकंप अधिक धोकादायक मानला जातो.

## केरळमध्ये हाय-स्पीड रेल्वेचा मुद्दा ऐरणीवर

**तिरअनंतपुरम** : विधानसभा निवडणुकीपूर्वी केरळमधील सर्व प्रमुख राजकीय आघाड्यांनी हाय-स्पीड रेल्वेचा मुद्दा जाहीरनाम्यात अग्रक्रमाने मांडला आहे. LDFने उत्तर-दक्षिण हाय-स्पीड रेल्वेसाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले, तर UDFने भारतीय रेल्वेच्या सहकार्याने कॉरिडॉर उभारणीसह तिरुवनंतपुरम व कोझिकोड येथे मेट्रो प्रकल्प सुचवला आहे. दरम्यान, NDAने तिरुवनंतपुरम ते कन्नूर दरम्यान हरित हाय-स्पीड नेटवर्क उभारून प्रवास वेळ ३ तास १५ मिनिटांवर आणण्याचे आश्वासन दिले आहे.

## इराणमध्ये राजकीय भूकंप; माजी राष्ट्रपती व परराष्ट्र मंत्र्यांवर देशद्रोहाचे आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोची** : मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धाला महिना उलटूनही तोडगा निघालेला नाही. या संघर्षामुळे जागतिक स्तरावर तणाव वाढला असून, युद्धविरामाची मागणी जगभरातून होत असताना इराणने अमेरिकेचा प्रस्ताव फेटाळून लावत कठोर भूमिका घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर इराणमध्ये मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. माजी राष्ट्रपती हसन रुहानी आणि माजी परराष्ट्र मंत्री मोहम्मद जावेद झरीफ यांच्यावर देशद्रोहाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हे दोघे अमेरिकेचे एजंट असल्याचा आरोप काही राजकीय नेत्यांकडून करण्यात येत असून, त्यामुळे देशांतर्गत राजकारण तापले आहे.

माहितीनुसार, मोहम्मद जवाद जरीफ यांनी युद्धविरामासाठी पुढाकार घेत अमेरिकेला प्रस्ताव पाठवला होता. यानंतर त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. इराणमधील काही कट्टर गटांनी याला देशहिताविरोधी भूमिका ठरवत त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. या आरोपांनंतर देशभरात संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, अनेक ठिकाणी आंदोलन सुरू झाले आहे. नागरिक रस्त्यावर उतरले असून दोन्ही नेत्यांच्या अटकेची मागणी जोर धरत आहे.

## बहुसंख्य भारतीय तटस्थतेच्या बाजूने; गरज पडल्यास इराणला पाठिंबा

# अमेरिका की इराण? भारताने कोणाची बाजू घ्यावी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : जागतिक पातळीवर अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात वाढत चाललेल्या तणावामुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने कोणती भूमिका घ्यावी, याबाबत C-VOTER या संस्थेने देशव्यापी सर्व्हे करून जनमत जाणून घेतले. या सर्व्हेमधून भारतीय नागरिकांचा कल आणि विचारप्रवाह स्पष्टपणे समोर आला आहे.

सर्व्हेनुसार, सुमारे ६० टक्के भारतीय नागरिकांचे मत आहे की भारताने या संघर्षात तटस्थ राहणेच हिताचे ठरेल. कोणत्याही एका देशाची बाजू न घेता संतुलित भूमिका ठेवणे, हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी योग्य असल्याचे बहुसंख्यांचे मत आहे. मात्र, जर भारतावर कोणत्याही एका देशाची बाजू घेण्याची वेळ आली, तर भारतीयांचा कल स्पष्टपणे इराणच्या दिशेने झुकलेला दिसतो. मार्च महिन्यातील वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये करण्यात आलेल्या या सर्व्हेमध्ये मतपरिवर्तनाची प्रक्रिया देखील लक्षवेधी ठरली. दुसऱ्या आठवड्यात ५६ टक्के नागरिकांनी इराणला समर्थन देण्याची भूमिका घेतली होती. तिसऱ्या आठवड्यात हा आकडा ६२ टक्क्यांवर गेला, तर चौथ्या आठवड्यात तब्बल ७४ टक्के लोकांनी इराणच्या बाजूने मत व्यक्त केले. यावरून भारतीय नागरिकांचा इराणबाबतचा विश्वास सातत्याने वाढत असल्याचे स्पष्ट होते. याउलट अमेरिकेबाबतचा विश्वास घटताना दिसतो. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात ४४ टक्के नागरिकांनी अमेरिकेला पाठिंबा दर्शवला होता. मात्र तिसऱ्या आठवड्यात हा आकडा ३८ टक्क्यांवर घसरला आणि चौथ्या आठवड्यात केवळ २६ टक्के लोकांनी अमेरिकेच्या बाजूने मत व्यक्त केले. त्यामुळे जागतिक घडामोडींनुसार भारतीयांचा दृष्टिकोन बदलत असल्याचे दिसून येते. संकटकाळात भारताने कोणावर विश्वास ठेवावा?” या प्रश्नावरही इराणकडे झुकणारा कल स्पष्ट झाला आहे. दुसऱ्या आठवड्यात २७ टक्के लोकांनी इराणवर विश्वास दर्शवला होता, तिसऱ्या आठवड्यात हा आकडा ३८ टक्क्यांवर पोहोचला आणि चौथ्या आठवड्यात ५८ टक्के लोकांनी इराणवर विश्वास व्यक्त केला. याउलट अमेरिकेवरील विश्वासात सातत्याने घट होताना दिसली. या सर्व्हेमधून आणखी एक महत्त्वाची बाब समोर येते ती म्हणजे भारतीय नागरिक युद्धाबाबत चिंतित आहेत. या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाची शक्यता निर्माण होऊ शकते, तसेच आण्विक युद्धाचा धोका वाढू शकतो, अशी भीती अनेकांनी व्यक्त केली आहे. या युद्धाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्था, इंधनदर, तसेच सर्वसामान्यांच्या जीवनावर होऊ शकतो, अशीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.एकूणच, भारतीय जनमत तटस्थतेकडे झुकलेले असले तरी परिस्थितीनुसार इराणला समर्थन देण्याचा कल अधिक स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकार कोणती भूमिका घेते, याकडे देशासह जगाचे लक्ष लागले आहे.